मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अतिरिक्त आयुक्तांकडून सर्व विभागांची झाडाझडती

## शंभर दिवस कृती कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा घेतला आढावा : विभागप्रमुख आणि कर्मचाऱ्यांनासोबत केली चर्चा

**पिंपरी | प्रतिनिधी**

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी राज्य सरकारच्या निर्देशानुसार पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने शंभर दिवसांचा कृती कार्यक्रम आखला आहे. या अनुषंगाने प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी विविध विभागांना भेटी देत तेथील विभागप्रमुख व कर्मचाऱ्यांसोबत चर्चा केली. यावेळी नागरिकांना दिल्या जाणाऱ्या ऑनलाईन सेवा, सर्व कार्यालयांची स्वच्छता मोहीम यावर भर दिला. तसेच अभिलेख व्यवस्थित ठेवणे, स्वच्छतेवर त्यांची अधिका-यांची झाडाझडती घेत कामावर लक्ष देण्याच्या सूचना दिल्या.



याप्रसंगी भांडार विभागाचे उपायुक्त निलेश भदाणे, उद्यान विभागाचे सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता अनिल भालसाखळे, स्थापत्य विभागाचे अभियंता बाळासाहेब शेटे, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी दिपक पवार यांच्यासह संबंधित विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते.

महापालिका प्रशासनाने तयार केलेल्या शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रमामध्ये महानगरपालिकेचे संकेतस्थळ सुसज्ज करणे, मुख्यालयासह सर्व कार्यालयांमध्ये सर्वंकष स्वच्छता मोहीम राबवून अनावश्यक गोष्टी काढून टाकणे, नागरिकांच्या तक्रारींचे जलद निवारण करणे, महापालिका क्षेत्रात उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या उद्योजकांना सर्वतोपरी सहकार्य करणे, त्यांच्यासाठी आखण्यात आलेल्या धोरणांची अंमलबजावणी करणे, अशा विविध बाबींवर भर देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने महापालिकेच्या सर्वच विभागांमध्ये काम सुरू करण्यात आले आहे. शंभर दिवसांच्या या कृती कार्यक्रमांतर्गत शिक्षण विभाग, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, स्थापत्य विभाग, विद्युत विभाग, पाणी पुरवठा विभाग, करसंकलन व कर आकारणी विभाग येथे आतापर्यंत कशा पद्धतीने काम करण्यात आले आहे, याचा आढावा घेण्यासाठी अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी थेट यासर्व विभागांना भेट दिली.

तसेच कृती कार्यक्रमाचे काटेकोर आयोजन आणि यशस्वी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नागरिकांचे जीवन सुखकर करण्यास प्राधान्य देणे आपल्या मुलभूत कर्तव्यांचा महत्त्वाचा भाग असून त्यासाठी सर्व विभागांनी आपापल्या स्तरावर काटेकोर नियोजन करावे, असेही त्यांनी सांगितले.

> शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत पिंपरी-चिंचवड महापालिकेने कमीत कमी कालावधीत कार्यालयीन कामकाज पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या सर्व विभागात हा कृती कार्यक्रम राबवण्यात येत आहे. कृती कार्यक्रमांचा आढावा सातत्याने घेण्यात येत असून त्यासाठी प्रत्यक्ष विभागांना भेटी देण्यात येत आहेत.
>
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# आगामी काळात 'एसआरए' अंतर्गत साडेचारशे चौरस फुटांची घरे द्यावीत

## केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांची मागणी; मुख्यमंत्री फडणवीस यांना देणार प्रस्ताव

**पिंपरी | प्रतिनिधी**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून एसआरए सदनिकांचा प्रकल्प राबवला जात आहे. मात्र, शहरात गोरगरीब झोपडपट्टीतील नागरिकांनी घरे मिळत आहेत, ही चांगली गोष्ट आहे. पण, आम्ही राज्य शासनाने कमीत कमी ४५० चौरस फुट (कारपेट एरिया) घरे द्यावीत, अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. यासंदर्भात लवकरच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून प्रस्ताव देणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.



आकुर्डी येथील सर्वे नं. ८८ मधील अजंठानगर एसआरए सदनिका प्रकल्पाचे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते शनिवारी (दि.२२) करण्यात आले. त्यावेळी आठवले यांनी पत्रकारांशी संवाद साधला. आठवले म्हणाले की, पुणे, मुंबई, ठाणे या सारख्या मोठ्या शहरात झोपडपट्टी निर्मुलन प्राधिकरणाने एसआरए सदनिका प्रकल्प राबवले आहेत. या एसआरए माध्यमातून गोरगरिबांना पक्की घरे मिळत आहेत. ही चांगली गोष्ट आहे. मात्र, आम्ही राज्य शासनाकडे कमीत ४५० चौरस फुटाची घरे असावीत,असा प्रस्ताव देणार आहे. त्यासाठी मुख्यमंत्र्याकडे आग्रह धरणार आहे. महापालिकेच्या निवडणुका कधीही होतील. त्या पार्श्वभूमीवर महायुतीतील पक्षांनी एकत्र निवडणूक लढावी, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

राज्यात महायुतीचे सरकार चांगल्या पध्दतीने काम करत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूकीत दहा ते बारा जागा आम्हाला मिळाव्यात, अशीही मागणी आठवले यांनी केली.

### राज ठाकरेंना महायुतीत घेऊ नये...

» राज ठाकरे यांना मुख्यमंत्री एकदा भेटले ते ठिक आहे. मात्र, त्यांना वारंवार भेटणे हे काही बरोबर नाही. राज ठाकरे यांना महायुतीत घेणे बरोबर नाही. तसेही त्यांचा महायुतीला काय फायदा होत नाही. ते आले तर आम्हांला काय मिळणार नाही, मित्रपक्षांनी आम्हांला विचारात घेतले पाहिजे, असे म्हणत केंद्रीय राज्यमंत्री तथा रिपाईंचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी राज ठाकरे यांच्या महायुतीत घेण्यास विरोध केला.

### सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणी कारवाई गरजेची

» आठवले म्हणाले की, परभणीतील संविधान विटंबना विरोधी आंदोलनात पोलिसांनी केलेल्या मारहाणीत सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला आहे. मृत्युमुखी पडलेल्या सोमनाथ सुर्यवंशीला न्याय मिळायला उशीर होत आहे. जबाबदार पोलिसांवर तातडीने कारवाई होणे गरजेची आहे. मात्र, अद्याप कारवाई झालेली नाही. तर मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

# विकसित भारताच्या स्वप्नाकरीता सर्वांनी भरीव योगदान द्यावे : अमित शाह

## महाराष्ट्रात 20 लाख लाभार्थ्यांना एकाच वेळी घरकुल मंजुरीचे पत्र; 10 लाख लाभार्थ्यांना प्रथम हप्त्याचे वितरीत

**पुणे | प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्राला सर्वात जास्त घरे देण्यात आली आहेत. महाराष्ट्रात 20 लाख लाभार्थ्यांना एकाच वेळी घरकुल मंजुरीचे पत्र देण्यात येत आहे. वीस लाख कुटुंबांच्या जीवनात एकाचवेळी आनंद निर्माण करण्याचा हा क्षण अत्यंत दुर्मिळ व ऐतिहासिक आहे, येणारी दिवाळी तुमच्या नवीन घरात सुखा-समाधाने साजरी करा आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या स्वप्नाकरीता आपण व आपल्या भावी पिढीने भरीव योगदान द्यावे, असे आवाहन देशाचे गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी केले.



ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्यावतीने श्री छत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे बालेवाडी येथे प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोन अंतर्गत २० लाख लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्राचे वाटप आणि १० लाख लाभार्थ्यांना प्रथम हप्त्याचे वितरण कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, माधुरी मिसाळ, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, खासदार प्रा. मेधा कुलकर्णी, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, विजय शिवतारे, भीमराव तापकीर, बापुसाहेब पठारे, शंकर मांडेकर, शंकर जगताप, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, ग्राम विकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार आदी उपस्थित होते.

भारताला 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याचे स्वप्न प्रधानमंत्री मोदी पाहत आहेत असे सांगून श्री. शाह म्हणाले, विकसित राष्ट्र म्हणजे भारतात राहणाऱ्या प्रत्येक माणसाला स्वतःचे घर, वीज, शौचालय , गॅस सिलिंडर, धान्य, पाच लाख रुपयांचे आरोग्य सुविधा हीच विकसित राष्ट्राची संकल्पना आहे.

### नागरिकांना हक्काचे घर उपलब्ध करुन देण्याकरीता केंद्र सरकार व राज्य शासन प्रयत्नशील

» उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताअंतर्गत नागरिकांच्या हक्काच्या घरांचे स्वप्नपुर्तीकरीता देशामध्ये २ कोटी घरे उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यापैकी अधिकाधिक घरे राज्यातील नागरिकांना मिळवून देण्याकरीता राज्य शासन प्रयत्नशील आहे. राज्यशासनाने १०० दिवसाचा विशेष कृती उपक्रमाअंतर्गत लोककल्याणकारी योजना व विकास कामांना गती देण्यात येत आहे. ग्रामविकास व पंचायतराज विभागाच्यावतीने घरकुलांना मंजुरी, हप्ता वितरण, घरकुले पूर्ण करण्यासोबतच भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्याबाबतची कामे करण्यात येत आहेत. महाआवास अभियानाअंतर्गत १ जानेवारी ते १० एप्रिल २०२५ या कालावधीत राबविण्यात येत असून १०० दिवसाचे उद्‌ष्टि केवळ 45 दिवसात पूर्ण केले.

### मोफत वीजेसाठी सौर पॅनलकरीता अनुदान देण्याचा निर्णय

» मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत यापूर्वी १ लाख २० हजार रुपये, नरेगामधून २८ हजार आणि शौचालय बांधकामासाठी १२ हजार रुपये असे एकूण १ लाख ६० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येते, आता यामध्ये ५० हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे; त्यामुळे आता यापुढे लाभार्थ्यांना दोन लाख रुपयांचे अनुदान मिळणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. या योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांमध्ये आता मोफत वीज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, त्यासाठी सोलर पॅनलकरीता आवश्यक असणारी रक्कम अनुदान स्वरुपात देण्यात येणार आहे. तसेच ही घरे पुरुषांसोबतच महिलांच्या नावावर करण्यात येणार आहेत. जिल्हा प्रशासनाने लाभार्थ्यांना प्राधान्याने वाळू उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

### गरीब माणसाच्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार होणार

» उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत महाराष्ट्राला २० लाख लाभार्थ्यांना घरकुल मंजुरीचे पत्र आणि दहा लाख लाभार्थ्यांच्या खात्यात या घरकुलांसाठीचा प्रत्यक्ष हप्ता जमा होणे हा क्षण महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक सोहळा आहे. या योजनेतून सर्वसामान्य गरीब माणसाच्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात प्रत्येक बेघराला घर देण्याचा संकल्प हाती घेतला असून त्यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रात २० लाख नागरिकांना आपल्या स्वतःच्या घरात प्रेमाचा संसार फुलविता येणार आहे. या योजनेसोबतच राज्यातील अन्य आवास योजनेतून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर घरकुले साकारली जात आहेत.

# मी येत्या दोन दिवसात माझ्या कार्यकर्त्यांसोबत चर्चा करणार : रविंद्र धंगेकर

## मिशन टायगर अंतर्गत रविंद्र धंगेकर यांचा शिंदे गटात प्रवेशाच्या चर्चांना पुन्हा एकदा सुरुवात झाली.

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला जनतेने नाकारत,महायुतीच्या हाती सत्ता दिली. त्यानंतर येत्या काही महिन्यात महापालिका निवडणुका होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. त्यामध्ये काँग्रेस पक्ष देखील जोमाने कामाला लागला आहे. त्या पार्श्वभूमीवर पुण्यात विधानसभा मतदार संघ निहाय प्रमुख नेत्यांच्या नियुक्तया करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये कसबा मतदार संघाचे माजी आमदार रविंद्र धंगेकर यांना डावलण्यात आल्याने, ते नाराज असल्याच्या चर्चा सुरू झाल्या.



त्याच दरम्यान रविंद्र धंगेकर यांनी व्हॉट्सअॅप स्टेट्सवर एक फोटो ठेवला, त्यामध्ये गळ्यात भगवं उपरणं परिधान केलेलं आहे. राजा हरला काय, राजा जिंकला काय, हा राजा असतो, निष्ठेत तडजोड नाही! आशा आशयाची पोस्ट सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाली आहे. तर चार दिवसांपूर्वी शिंदे गटाचे नेते आणि मंत्री उदय सामंत यांची रविंद्र धंगेकर भेट घेतली होती. त्या भेटीचे फोटो उदय सामंत यांनी ट्विट केले होते. त्यामुळे मिशन टायगर अंतर्गत रविंद्र धंगेकर यांचा शिंदे गटात प्रवेशाच्या चर्चांना पुन्हा एकदा सुरुवात झाली.

पक्ष प्रवेशाबाबत रविंद्र धंगेकर यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले, “माझे सर्व पक्षात मित्र आहे. माझ्या सर्वांशी गाठीभेटी सुरू असतात. येणं जाणं होत, त्याप्रमाणेच चार दिवसांपूर्वी माझ्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त माझी उदय सामंत यांच्याशी भेट झाली होती आणि त्या भेटीचे फोटो समोर आले. त्यावरुन अनेक चर्चा सुरू झाल्या आहे. पण आमच्या दोघांमध्ये कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही. उदय सामंत हे माझे जुने मित्र आहे.आमची सहज भेट झाली असून यापुर्वी मी एकनाथ शिंदे,अजित पवार यांना देखील भेटलो आहे. यामुळे उदय सामंत यांच्या भेटीमुळे कोणताही राजकीय वेगळा अर्थ काढू नये अशी भूमिका यावेळी त्यांनी मांडली.

### कार्यकर्त्यांसोबत चर्चा करणार

» सोशल मीडिया माझा जो फोटो व्हायरल होत आहे. तो शिवजयंतीमधील आहे.तो चांगला वाटला म्हणून स्टेटसला ठेवला, त्यामध्ये काहीही गैर नाही.तसेच मी काँग्रेसमध्येच आहे. मला माझ्या धर्माचा अभिमान असून द्वेष करण आपल्याला जमत नाही. पण मागील काही दिवसात राजकीय वर्तुळात जे काही सुरू आहे. त्याबाबत मी येत्या दोन दिवसात माझ्या कार्यकर्त्यांसोबत चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# सायबर पोलिसांचा सर्जिकल स्ट्राईक, परराज्यात जाऊन आरोपींच्या आवळल्या मुसक्या ...

## सायबर गुन्ह्यांची व्याप्ती वेगाने वाढत असताना, पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी देशभरात आपली छाप उमटवली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

ऑनलाइन पद्धतीने विविध स्वरूपाची आमिषाने नागरिकांना गंडा घालणाऱ्या शंभरहून अधिक आरोपींच्या मुसक्या आवळण्यात पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या सायबर सेलला यश आले आहे. मागील वर्षभरात परराज्यात जाऊन तब्बल १०२ सायबर गुन्हेगारांच्या मुसक्या सायबर सेलने आवळल्या आहेत. देशाच्या विविध भागांतून, तसेच रशियातूनही आरोपींना अटक करून त्यांना न्यायालयासमोर हजर करण्याची कामगिरी सायबर पोलिसांनी बजावली आहे.

या मोठ्या अभियानामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे, सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण स्वामी, पोलीस उपनिरीक्षक सागर पोमण, पोलीस उपनिरीक्षक वैभव पाटील, तसेच पोलीस अंमलदार हेमंत खरात, दीपक भोसले, सुभाष पाटील, विशाल निचीत, दीपक माने, खणसे, नितेश बिचेवार, अतुल लोखंडे, सौरभ घाटे आणि महिला अधिकारी दीपाली चव्हाण या अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमामुळे हे यश मिळाले आहे.




### पोलीस अधिकाऱ्यांवर हल्ल्याचा प्रयत्न

» गुजरात, राजस्थान, झारखंड आणि महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये जाऊन सायबर पोलिसांनी आरोपींना अटक केली. विशेष म्हणजे, या धडक कारवाईदरम्यान पोलिसांना प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागला. जयपूर येथे सायबर गुन्ह्यातील एका आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या पथकावर हल्ल्याचा प्रयत्न झाला. साहाय्यक निरीक्षक प्रवीण स्वामी यांच्या अंगावर आरोपींनी गाडी घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रसंगावधान राखत आणि जिवावर उदार होऊन स्वामी यांच्या पथकाने आरोपीला अटक केली. या धाडसी कारवाईमुळे पिंपरी-चिंचवड पोलिसांचे संपूर्ण राज्यात कौतुक होत आहे.

**पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांचा राज्यभरात दबदबा**

सायबर गुन्ह्यांची व्याप्ती वेगाने वाढत असताना, पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी देशभरात आपली छाप उमटवली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, वेळेचे भान आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर या पथकाने गेल्या वर्षभरात अभूतपूर्व कामगिरी केली आहे. त्यांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे राज्यभरात पोलीस दलाची प्रतिष्ठा उंचावली आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि पोलीस पथकाची मेहनत**

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई पार पडली. तसेच, सह पोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपआयुक्त संदीप डोईफोडे आणि साहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या अधिकाऱ्यांनी सायबरसह एकूणच पोलिसांना फ्री हॅण्ड दिल्याने कारवाईचा आलेख वाढता राहिला आहे.

### सायबर गुन्ह्यांवरील कठोर कारवाई

» सायबर गुन्ह्यांचे प्रमाण झपाट्याने वाढत असून, गुन्हेगार अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना मोठ्या प्रमाणात फसवत आहेत. बनावट शेअर मार्केट गुंतवणूक, बँकिंग फसवणूक, हॅकिंग, फिशिंग आणि सोशल मीडिया फसवणुकीसारख्या गुन्ह्यांवर पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. याआधी निष्क्रिय वाटणाऱ्या सायबर पोलिसांनी आता धडाकेबाज कारवाई करत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केली आहे.

### मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडून विशेष गौरव

» पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांच्या या अभूतपूर्व कामगिरीची दखल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतली आहे. सायबर पोलिसांच्या कार्याची प्रशंसा करत त्यांनी त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. त्यामुळे पिंपरी-चिंचवड पोलीस दलाच्या शिरपेचात आणखी एक तुरा रोवला गेला आहे.

# पिंपरी चिंचवड शहरातील खाजगी 'आरओ' प्लॅन्टसवरील निर्बंध हटवण्याचा निर्णय

## काही अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे, याबाबत आयुक्त शेखर सिंह यांनी स्वतंत्र आदेश निर्गमित केले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील काही भागांमध्ये जीबीएसचे रुग्ण आढळून आल्याने, या भागातील ५८ खाजगी रिव्हर्स ऑस्मोसिस (आरओ) प्लॅन्ट्स पूर्वी बंद करण्यात आले होते. मात्र, पिण्याच्या शुद्ध पाण्याची गरज लक्षात घेऊन महानगरपालिकेने ठराविक अटी व शर्तींसह या प्लॅन्ट्सना पुन्हा सुरू करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी काही अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे. याबाबत आयुक्त शेखर सिंह यांनी स्वतंत्र आदेश निर्गमित केले आहेत.

**महानगरपालिकेच्या अटी व शर्ती:**

१) खाजगी "आरओ" प्लॅन्ट चालक यांनी महानगरपालिकेकडे रीतसर नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित प्रभागातील कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांचेकडे अर्ज करावा.

२) खाजगी "आरओ" प्लॅन्ट मालक किंवा चालक यांनी तातडीने त्यांच्या मूळ उत्पादक कंपनीकडून किंवा प्लॅन्ट दुरूस्त करणारी संस्था यांचेकडून संपूर्ण "आरओ" प्लॅन्टसची देखभाल दुरूस्ती करून घेऊन त्याबाबतचा प्रत्येक ६ महिन्यांनी दाखला संबंधित कंपनीकडून घ्यावा. तसेच देखभाल दुरूस्तीचे प्रत्यक्ष काम सुरू असतानाचे सुस्पष्ट, तारीख, वेळ व जियो टॅगसह फोटो काढावेत.

३) मुख्य उत्पादक कंपनी किंवा प्लॅन्ट देखभाल-दुरूस्त करणारी संस्था यांचेकडून सदर प्लॅन्टच्या आउटलेटचे पाणी मानक, IS -10500 (2012) व WHO च्या मार्गदर्शक तत्वानुसार शुध्दीकरण करण्यासाठी प्लॅन्ट योग्य प्रकारे कार्यान्वित असल्याचा दाखला सादर करावा.

४) राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रयोगशाळेकडून सदर "आरओ" प्लॅन्टद्वारे येणारे पाणी पिण्यास योग्य असल्याबाबत दर महिन्याला स्रोतामधील पाणी व शुद्ध केलेले पाणी यांची गुणवत्ता तपासणी करावी व टेस्ट रिपोर्ट त्यांचेकडून प्राप्त करून घ्यावा व तो प्रभागात सादर करावा.

५) या "आरओ" प्लॅन्टसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पाणी वापर करत असल्यास सदर नळजोड नियमान्वित करून, बिगर घरगुती दराने मीटरनुसार त्या पाण्याचे बिल महानगरपालिकेकडे भरावे. तसे न केल्यास कनेक्शन व आरओ प्लॅन्ट कायमस्वरूपी बंद केले जाईल.



> महानगरपालिकेच्या या निर्णयामुळे नागरिकांना शुद्ध व योग्य प्रमाणात पाणी उपलब्ध होण्यास मदत होईल. तरी, संबंधित आरओ प्लॅन्ट धारकांनी महापालिकेने दिलेल्या अटी व शर्ती आणि नियमांचे पालन करून अधिकृत परवानगी घेऊनच आरओ प्लॅन्ट्स सुरू ठेवावेत.
>
> **- प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# राजापूरच्या प्रत्येक शेतात फुलते गुलछडीचे पीक

## गुलछडीचे आणि काडी गुलछडीचे पीक हे घरटी घेतले जाते तसेच झेंडू , ॲस्टर, कामिनी, मोगरा , लिली अशा वेगवेगळी फुलांची शेती केली जाते.

**पुणे | प्रतिनिधी**

भोर तालुक्याच्या पूर्वेस असलेल्या नीरा नदीच्या तीरावर वसलेल्या साधारण शंभर ते सव्वाशे उंबरठा असलेल्या राजापूर गावामध्ये गुलछडीचे आणि काडी गुलछडीचे पीक हे घरटी घेतले जाते तसेच झेंडू , ॲस्टर, कामिनी, मोगरा , लिली अशा वेगवेगळी फुलांची शेती केली जाते.



यामुळे या गावाला गुलछडीचे व फुलांचे गाव म्हणून परिसरात ओळखले जाते. गुलछडीसाठी आवश्यक असणारे पाणी, तापमान, जमीन, आवश्यक मजूर पुरवठा, वारंगुळा पद्धतीने एकमेकांना मदत करून शेतीची कामे केली जातात. तसेच पुणे येथील गुलटेकडीचे असणारे फुल मार्केट आणि गावातीलच असलेली उत्तम वाहन व्यवस्था यामुळे गावातील प्रत्येक शेतकऱ्याकडे ऊस,ज्वारी, गहू, कांदा, भुईमूग या पिकांबरोबरच गुलछडीचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते.

गावातील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञान,हवामान, पाणी, वातावरण, उपलब्ध मजूर यांच्यामध्ये मेळ घालत नगदी उत्पादन देणारी गुलछडी पीक घेत आहे. पूर्वमशागत करताना ट्रॅक्टरच्या सहाय्याने उभी आडवी खोल नांगरट करून लागवडीपूर्वी नांगरलेली जमीन किमान एक महिना उन्हात चांगली तापू दिली जाते. आवश्यकतेनुसार शेणखत टाकले जाते. नांगरणी करून, फणपाळी व रोटर मारून जमीन भुसभुशीत करून घेतली जाते. अनेक शेतकरी घरच्या शेतीतच तयार केलेला गुलछडीच्या गंड्याचा वापर करून ४ फूट सरीतील पाटपाण्याचे शेजारी आठ इंचावर गंड्याची लागवड करतात.

त्यानंतर गुलछडीच्या गुणवत्तापूर्ण वाढीसाठी खतांचा पहिला डोस गुलछडीचा फुटवा झाल्यावर साधारणता एक महिना झाल्यावर, सुपला, महाधन, १०:२६:२६ आणि १९ : १९ असा मिश्र खतांचा डोस दिला जातो. दुसरा डोस दोन ते अडीच महिन्यांत देतात. तिसरा डोस साडेतीन महिन्यांत गुलछडीच्या कडेला खड्डा घेऊन किंवा टाकून खतांचा डोस दिला जातो. तसेच पाण्यातून ही फुटव्यासाठी औषधे सोडली जातात वातावरणात होणाऱ्या बदलानुसार कीटकनाशकाची फवारणी केली जाते. विशेषत: थंडीच्या काळात फुलांची विशेष काळजी घेतली जाते. काही शेतकरी पाटपाणी तर काही शेतकरी स्प्लिंकर, रेन पाईप, ठिंबक यांचा वापर करून आवश्यकतेनुसार तापमानातील बदलानुसार पाणी देतात.

> राजापूर गावामध्ये जवळपास ९५ टक्के लोक शेतीचा व्यवसाय करताना नगदी पीक म्हणून ओळखले जाणारे गुलछडी पीक घेतले जाते. गुलछडीला वर्षभर मागणी असते कोणताही आनंदाचा उत्सव या शिवाय पूर्ण होत नाही. भावामध्ये चढउतार होत असतात साधारणतः सध्या काडी गुलछडीला १५० ते २७० रुपयांपर्यंत भाव मिळत आहे. तसेच गुलछडीला पन्नास ते दोनशे रुपये किलो याप्रमाणे दर मिळतो. काडी गुलछडी साधारणत: दुपारी चार वाजेनंतर कापली जाते घरी आणून त्याचे दहा काडीचे बंडल बनवले जातात. नंतर सर्व बंडल एकत्र करून १०-१० चा मोठा बंडल बांधला जातो. तसेच पहाटे पाच ते सात या वेळेमध्ये गुलछडी तोडून बाजारपेठेत पाठवली जाते.
>
> **- किरण राजेंद्र बोबडे, प्रयोगशील शेतकरी राजापूर**

> फुलांचा हार, गजरे, माळा, वेण्या, लग्नसमारंभासाठी मोठ्या प्रमाणावर फुलांना मागणी असते. फुलदांड्यांचा फुलदाणी, पुष्पसजावट, सुगंधी द्रव्य निर्मितीसाठी होत असल्याने निशिगंधाच्या फुलांना बाजारात वर्षभर मागणी असते. पाणी,खत,तण नियंत्रण यांचे सुयोग्य नियोजन करून जास्त उत्पादन घेता येते. पुण्याच्या मार्केटजवळच असल्याने हक्काची बाजारपेठ उपलब्ध असल्याने रोजच्या रोज चांगल्या भावाने विक्री होते. यामुळे राजापूर गावात गुलछडीचे घरटी पीक घेतले जाते.
>
> **- नवनाथ बोबडे, प्रयोगशील शेतकरी**

# गडकोटांवर येणाऱ्या पर्यटकांची सुरक्षा वाढणार; अनधिकृत बांधकामे काढण्याबाबतच्या मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्याचे स्वागत

## गड किल्ल्यांवर येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही ठोस उपाययोजना करण्या संदर्भात शासनाने संबंधित विभागांना आदेश दिले पाहिजेत, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ व शिवप्रेमींकडून होत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शिवजयंतीच्या शुभमुहूर्तावर शिवजन्मभूमी किल्ले शिवनेरीवर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी गड किल्ले संवर्धनासाठी भविष्यामध्ये मोठ्या प्रमाणात निधी देतानाच गड किल्ल्यांवर असलेली अनधिकृत बांधकामे काढण्यासंदर्भात सुचित केले आहे. त्यांच्या या निर्णयाचे राजगड तालुक्यासह राज्यभर स्वागत होत असतानाच गड किल्ल्यांवर येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही ठोस उपाययोजना करण्या संदर्भात शासनाने संबंधित विभागांना आदेश दिले पाहिजेत, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ व शिवप्रेमींकडून होत आहे.



दिवसेंदिवस गड किल्ल्यांवर जाणाऱ्या येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून किल्ले व परिसरात अपघाताचे प्रमाणही वाढले आहे. यास हिंदवी स्वराज्याची प्रथम राजधानी किल्ले राजगड व स्वराज्याचे तोरण बांधलं तो किल्ले तोरणा गडही अपवाद नाहीत. मागील काही वर्षांमध्ये या दोन्ही गडकोटांवर व गडकोट परिसरामध्ये अपघाताचे प्रमाण वाढले असून अनेकांना यात आपला जीव गमवावा लागला आहे. काही अपघात हे तर किरकोळ कारणांमुळे झाले आहेत. यावर उपाययोजना करून पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी शासकीय पातळीवर पुरातत्त्व विभाग, वन विभाग व पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने प्रयत्न होणे अत्यंत गरजेचे आहे.

शनिवार, रविवार व शासकीय सुट्टीच्या दिवशी राजगड व तोरणा किल्ल्यावर येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. त्या दृष्टीने प्रशासनाने विशेषता वनविभाग, प्राथमिक आरोग्य विभाग, पुरातत्त्व विभाग व पोलीस प्रशासनाने योग्य तो समन्वय राखून कमीत कमी गर्दीच्या दिवशी तरी पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. असे राजगड पायथा गुंजवणे गावचे सरपंच गुलाब रसाळ यांनी सांगितले.

मागील काही दिवसांमध्ये पर्यटक तटबंदीवरून घसरून पडणे, पाण्याच्या तलावामध्ये पडून मृत्यू होणे व तटबंदीचा दगड डोक्यात पडून मृत्यू झाल्याचे प्रकार समोर आले आहेत. तसेच गड चढताना किंवा उतरताना हृदयविकाराचा झटका येणे, गडकोट परिसरात काही हत्याही झाल्या आहेत. गडापर्यंत जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे किंवा काही ठिकाणी रस्तेच नसल्यामुळे अनेक पर्यटक हे अपघातात गंभीर जखमी झाले आहेत तर काहींचा यात मृत्यू देखील झाला आहे. यांना वेळीच उपचार मिळाले असते तर यातील अनेक जण वाचले असते. परंतु तसे न झाल्यामुळे अनेक पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला.

> पुरातत्व विभाग व वनविभाग यांना सरकारकडून विविध कामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त होतो. निधी खर्च होतो पण कामे दिसत नाहीत. वन विभागामार्फत प्रत्येक वर्षी वृक्ष लागवड केली जाते. पण वृक्षच दिसत नाहीत, मात्र खर्च झालेला दिसतो हे न समजणारे कोडे आहे.
>
> **- शेखर लिम्हण, ग्रामस्थ, विंझर (ता.राजगड)**

> आम्ही अनेक वर्ष सहकुटुंब राजगड तोरणा ट्रेकसाठी प्रत्येक वर्षी जात असतो. परंतु वस्तुस्थिती पाहता म्हणाव्या तशा सुविधा पर्यटकांसाठी कुठेच मिळत नाहीत. अनेक वेळा आम्ही गडकोट व परिसरात झालेल्या अपघातासारख्या घटना पाहिल्या आहेत. त्यावेळी मोठ्या प्रमाणात स्थानिक लोक तातडीने मदतीसाठी धावून येतात. मात्र, शिवप्रेमींच्या व पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने ठोस उपाययोजना करायलाच पाहिजेत.
>
> **- प्रवीण इंदोलीकर, पर्यटक सांगली**